# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


**अतितात्काळ**

क्रमांक : ३/तंशिस/con/२०१३/ २०
दिनांक : २४/०६/२०१३

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषयः- "Result and Concession Management" मध्ये विद्यार्थ्यांची माहिती त्वरीत अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र. ३/तंशिस/con/२०१३/०५ दि. ०५.०४.२०१३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्रान्वयें तसेच एसएमएस द्वारे या संचालनालयाने "Result and Concession Management" प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करण्याबाबत शासकीय, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांना वारंवार कळविण्यात आले होते. तथापि, असे निदर्शनास येते की, अद्याप ब-याच संस्थांनी आवश्यक ती माहिती भरलेली नाही किंवा चुकीची माहिती भरलेली आहे. सदरहू माहिती मा.मुख्यमंत्री कार्यालयाने तात्काळ मागविलेली आहे. तरी आपल्या नियंत्रणाखालील ज्या संस्थांनी सदरची माहिती अद्ययावत केली नसेल, त्यांना दि. ०४.०७.२०१३ पर्यंत अद्ययावत करण्याबाबत सुचित करावे. सदर माहिती ग्राहय धरुन फी प्रतिपूर्तीच्या सवलती मंजूर केल्या जातील. तसेच ज्या संस्था माहिती अद्यायावत करणार नाहीत त्या संस्थांना २०१३-१४ मध्ये फी प्रतिपूर्ती संबंधीच्या सवलती मंजूर केल्या जाणार नाहीत याची कल्पना सर्व संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात यावी. तसेच आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून संस्थानिहाय व प्रवर्ग निहाय फी प्रतिपूर्ती द्वारे मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व एकूण मिळालेले अनुदान तसेच प्रवर्ग निहाय सवलती न मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व न मिळालेले अनुदान याबाबतची माहिती संकलित करुन अहवाल आपण दि.०५.०७.२०१३ पर्यंत पाठवावा.

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रत - १. उपसचिव, तंत्रशिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२. प्राचार्य, सर्व शासकीय / शासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त माहिती ही तात्काळ भरुन या कार्यालयास तसेच संबंधित विभागीय कार्यालयांना कळविण्यात यावे.

---

**अत्यंत महत्वाचे**

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर
क्र. तंशिस/प्राकाना/शैवि/२०१२/ १९१७
दि. २९ JUN 2013 /२०१३

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था, नागपूर विभाग

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नुमद केल्यानुसार रिझल्ट ॲन्ड कन्सेशन मॅनेजमेंट मध्ये विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत केली नसेल त्यांनी **दि. ०४.०७.२०१३** पर्यंत अद्ययावत करून माहिती परस्पर संचालनालयास पाठविण्यांत यावी व एक प्रत या कार्यालयास त्वरीत सादर करावी. सदर माहिती ग्राहय धरून फी प्रतिपुर्तीच्या सवलती मंजुर केल्या जातील, तसेच ज्या संस्था माहिती अद्ययावत करणार नाहीत, त्या संस्थांना २०१३–१४ मध्ये फी प्रतिपुर्ती संबधीच्या कोणत्याही सवलती मंजुर केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर